आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 19/02/२०२६ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 65 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# महाराष्ट्रातील राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी 16 मार्चला मतदान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**नवी दिल्ली : भारतीय निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या 37 जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, यामध्ये महाराष्ट्रातील 7 जागांचा समावेश आहे. या रिक्त होणाऱ्या जागांसाठी येत्या 16 मार्च 2026 रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.**

महाराष्ट्रासोबतच ओडिसा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतील रिक्त होणाऱ्या जागांसाठी ही निवडणूक होणार आहे.

महाराष्ट्रातील राज्यसभेचे सदस्य असलेले डॉ. भागवत किशनराव कराड, डॉ. फौजिया तहसीन अहमद खान, प्रियंका विक्रम चतुर्वेदी, शरदचंद्र गोविंदराव पवार, धैर्यशील मोहन पाटील, रजनी अशोकराव पाटील आणि रामदास आठवले या सात सदस्यांचा कार्यकाळ 2 एप्रिल रोजी संपणार आहे. या निवडणुकीची 26 फेब्रुवारी रोजी अधिसूचना जारी केली जाईल, तर उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख 5 मार्च 2026 असेल. अर्जांची छाननी 6मार्च रोजी केली जाणार असून 9 मार्चपर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येतील.

मतदान 16 मार्च रोजी सकाळी 9 ते दुपारी 4 या वेळेत होईल आणि त्याच दिवशी संध्याकाळी 5 वाजता मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाईल.

मतदानासाठी निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या विशेष जांभळ्या स्केच पेनचाच वापर करणे बंधनकारक असेल असे आयोगाने स्पष्ट केले आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया 20 मार्च 2026 पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत.

# विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर ॲक्शन मोडवर!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहरातील यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटल येथे आज विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी अचानक पाहणी दौरा करत प्रशासनाला धारेवर धरले.**



या अचानक दौऱ्यात रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळ कोणतीही सक्षम सुरक्षा यंत्रणा नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. प्रवेशद्वारावर येणाऱ्या नागरिकांची मेटल डिटेक्टर मशीन किंवा बॅग तपासणी यंत्राद्वारे तपासणी होत नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत स्पष्ट झाले.

भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की, शहरात वाढत्या अनुचित घटनांच्या पार्श्वभूमीवर रुग्णालयासारख्या संवेदनशील ठिकाणी ठोस सुरक्षा व्यवस्था असणे अत्यावश्यक आहे. सुरक्षा अभावी समाजकंटकांकडून कोणताही अनुचित प्रकार घडून रुग्ण, डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो.

या गंभीर बाबी लक्षात घेता त्यांनी महापालिका आयुक्तांना तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. विशेषतः वायसीएम रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर मेटल डिटेक्टर मशीन आणि बॅग चेकिंग मशीन बसवण्याचे आदेश संबंधित विभागाला तातडीने द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

"रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड चालणार नाही," असे स्पष्ट करत भाऊसाहेब भोईर यांनी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी भूमिका मांडली. या पाहणी दौऱ्यानंतर आता महापालिका प्रशासन कोणती ठोस उपाययोजना करते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेस पूर्णवेळ आयुक्त नेमावा-रविराज काळे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महापालिकेला तातडीने पूर्णवेळ आयुक्त नेमावा, अशी मागणी रविराज काळे, शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी यांनी केली आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक 2026 पार पडून नवीन महापौरांची निवड झाली असली तरी, प्रशासनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले आयुक्तपद मागील चार महिन्यांपासून प्रभारी स्वरूपात आहे. यामुळे शहरातील विकासकामे आणि दैनंदिन नागरी सेवा प्रभावित होत असल्याचे काळे यांनी म्हटले आहे.

महापालिका आयुक्तपदावरून शेखर सिंह यांची बदली करण्यात आली. त्यांच्याकडे नाशिक कुंभमेळ्याची जबाबदारी सोपविल्यानंतर 'महामेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे तात्पुरता पदभार देण्यात आला. मात्र, सरकारकडून अद्याप कायमस्वरूपी आयुक्त नेमणुकीचा निर्णय न झाल्याने प्रशासनात संभ्रमाचे वातावरण आहे.

रविराज काळे यांनी सांगितले की, शहरात अनेक महत्त्वाच्या नागरी समस्या प्रलंबित आहेत. अनियमित पाणीपुरवठा, कचरा संकलन व प्रक्रिया व्यवस्थेतील त्रुटी, अपूर्ण रस्ते व पूल, पायाभूत सुविधा प्रकल्प तसेच निविदा व अर्थसंकल्पासंदर्भातील निर्णयांमध्ये विलंब होत आहे.

प्रभारी आयुक्तांकडे एकाच वेळी दोन जबाबदाऱ्या असल्याने नागरिकांना महापालिकेत त्यांची भेट होत नसल्याची तक्रारही त्यांनी केली. प्रशासकीय राजवट संपल्यानंतर शहराच्या विकासाला वेग मिळेल, अशी अपेक्षा होती; मात्र पूर्णवेळ आयुक्त नसल्याने प्रशासनाला ठोस दिशा मिळत नसल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

पिंपरी-चिंचवड शहरासाठी तातडीने कायमस्वरूपी आयुक्त नेमून नागरिकांना दिलासा द्यावा आणि या संदर्भातील कार्यवाहीबाबत लेखी उत्तर द्यावे, अशी मागणी रविराज काळे यांनी केली आहे.

पिंपरी-चिंचवडमधील वाढत्या नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर आता राज्य सरकार काय निर्णय घेते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# शिवसृष्टी येथे शाहिरीतून दुमदुमली छत्रपतींची पराक्रमगाथा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : शिवजन्माची पावन पहाट... राजमाता जिजाऊंच्या संस्कारांची तेजस्वी छाया... तोरणा जिंकत स्वराज्याची रोवलेली पहिली मुहूर्तमेढ... लाल महालातील शौर्यगाथा... राज्याभिषेकाच्या सुवर्णक्षणाने साकारलेले हिंदवी स्वराज्य... असा शिवजन्मापासून राज्याभिषेकापर्यंतचा तेजस्वी प्रवास साकारत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अद्वितीय जीवनकार्याला शाहिरी पोवाड्यातून मानवंदना अर्पण करण्यात आली.



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, शौर्य, धैर्य आणि न्यायनिष्ठेचे प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अद्वितीय कार्याला आणि व्यापक विचारधारेला अभिवादन करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हर्डीकर तसेच अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व 2026' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या पर्वात 17 फेब्रुवारी रोजी थेरगाव येथील डांगे चौक येथील शिवसृष्टी येथे "छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडा" हा विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. शाहीर सुरेश सूर्यवंशी (आसंगीकर) यांनी सादर केलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. नगरसदस्य विश्वजित बारणे यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमाला होती. सोबतच महापालिकेचे विद्युत पर्यवेक्षक प्रमोद खराडे,करण तुपे यांच्यासह किशोर केदारी आदी उपस्थित होते.

शिवपूर्व इतिहासकाल, शिवजन्म सोहळा, स्वराज्यस्थापना ते शिवराज्याभिषेक असा सुरेल प्रवास शाहीर सुरेश सूर्यवंशी, शाहीर घनश्याम कुदळे,कांचनताई सूर्यवंशी, बालशाहीर विश्वजित सूर्यवंशी, बालशाहीर अथर्व गायकवाड, किबोर्ड वादक बापू बनसोडे, ढोलकी वादक राहुल सूर्यवंशी, झांझ वादक श्रेयस सूर्यवंशी आणि दादा गायकवाड या सर्वांनी दमदार सादरीकरणातून मांडला.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करत, डफ, तुणतुणे, ढोलकी, खंजिरी अशा वाद्यांच्या घोषात, पहाडी आवाजात नामवंत शाहिरांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनचरित्र सादर केले. या कार्यक्रमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा सुवर्ण इतिहास उपस्थित नागरिकांसमोर उभा राहिला. शिवजन्म सोहळा, तोरणा मोहीम अशा पोवाड्यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

# पिंपरीत 216 ग्रॅम गांजासह तरुण अटकेत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी पोलिसांनी अंमली पदार्थविरोधी कारवाई करत गांजा बेकायदेशीररीत्या विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका तरुणास अटक केली आहे.

या कारवाईत 216 ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत 14 हजार 500 रुपये इतकी आहे.

ही कारवाई दि. 17 फेब्रुवारी 2026 रोजी सायंकाळी 6.10 वाजण्याच्या सुमारास, भाटनगर, पिंपरी येथील बिल्डिंग नं. 6 जवळील रोडच्या कडेला करण्यात आली.

पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयिताची झडती घेतली असता त्याच्या ताब्यात गांजा आढळून आला.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव सनी धर्मसिंग माचकर (वय 21) असे असून तो मूळचा श्रमीकनगर, दिक्षीरोड, ओझर मिगा, ता. निफाड, जि. नाशिक येथील रहिवासी आहे. सध्या तो भाटनगर, पिंपरी येथे राहत असल्याचे तपासात उघड झाले आहे.

या प्रकरणी पिंपरी पोलिस ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट कलम 8(क),




20(ब)(ii)(ब), 29 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई पिंपरी पोलिस ठाण्याचे पोलीस हवालदार विष्णु गौतम भारती यांनी केली असून पुढील तपास सुरू आहे.

# पिंपरीत 3 महिलांना गांजासह अटक; 452 ग्रॅम गांजा व मोबाइल जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या अमली पदार्थविरोधी पथकाने पिंपरी परिसरात कारवाई करत तीन महिला आरोपींना गांजासह अटक केली आहे.**



आरोपींच्या ताब्यातून 452 ग्रॅम वजनाचा गांजा व मोबाइल फोन असा एकूण 81 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई दि. 17 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 7.30 वाजण्याच्या सुमारास, पिंपरी पोलिस स्टेशन हद्दीतील भाटनगर येथील इमारत क्रमांक 5 समोरील मोकळ्या सार्वजनिक जागेत करण्यात आली.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार संशयित महिलांवर नजर ठेवून त्यांची झडती घेण्यात आली असता गांजा आढळून आला. अटक करण्यात आलेल्या महिला आरोपी या गांजा बेकायदेशीररीत्या विक्रीसाठी बाळगत असल्याचे तपासात उघड झाले आहे. तसेच त्यांनी एकमेकांच्या मदतीने गांजा कोठून व कोणाकडून आणला, याबाबत माहिती घेतली जात असून, ग्राहकांना गांजा विक्री करण्याचा त्यांचा हेतू असल्याचेही निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी एनडीपीएस ॲक्ट कलम 8(क), 20(ब)(ii)(ब), 29 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अमली पदार्थविरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाचे पोलीस हवालदार गणेश बाबासाहेब कर्पे यांनी केली असून पुढील तपास सुरू आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 19/02/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# प्रभाग 21 मधील जिजामाता रुग्णालयासाठी सुविधा वाढवण्याची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**प्रभाग क्रमांक 21 अंतर्गत येणाऱ्या जिजामाता रुग्णालयात वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर हाउसकीपिंग, सुरक्षारक्षक, तज्ञ डॉक्टर व वैद्यकीय स्टाफची तातडीने भरती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.**



अशी मागणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका निकिता अर्जुन कदम यांनी आरोग्य अधिकारी डॉ. गोफणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जिजामाता रुग्णालयात दिवसेंदिवस रुग्णसंख्या वाढत असून, सध्याचे मनुष्यबळ अपुरे पडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हाउसकीपिंग व सुरक्षा व्यवस्था सक्षम नसल्याने रुग्ण व नातेवाईकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तसेच विविध उपचारांसाठी तज्ञ डॉक्टर व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सध्या विविध तपासण्यांसाठी रुग्णांना थेरगाव रुग्णालय किंवा यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटल येथे जावे लागत असल्याने मोठी धावपळ होत आहे. या पार्श्वभूमीवर जिजामाता रुग्णालयातच सिटीस्कॅन व एमआरआय मशीन तातडीने उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणीही करण्यात आली आहे. वाढत्या आरोग्य सेवांच्या गरजा लक्षात घेता प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, जेणेकरून नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्य सेवा मिळू शकतील, अशी अपेक्षा नगरसेविका निकिता कदम यांनी व्यक्त केली आहे. आता महापालिका प्रशासन यावर काय निर्णय घेते, याकडे प्रभाग 21 मधील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वात 'शिवगर्जना' ठरतेय मुख्य आकर्षण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी, 'जय भवानी, जय शिवाजी', 'हर हर महादेव' च्या जयघोषात आणि स्वराज्याच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या नेत्रदीपक दृश्यांनी निगडी येथील नियोजित महापौर निवास परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'विचार प्रबोधन पर्वा'अंतर्गत सादर करण्यात आलेल्या 'शिवगर्जना' या भव्य महानाट्याच्या पहिल्या प्रयोगाला शिवप्रेमींनी प्रचंड प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.**



महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते या महानाट्याचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसदस्य अमित गावडे, राजू मिसाळ, अभिषेक बारणे, चेतन भुजबळ, नगरसदस्या शैलजा मोरे, अर्चना कारंडे,माजी नगरसदस्य मारुती भापकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते जीवन बोराडे, सागर तापकीर, निलेश शिंदे, प्रकाश जाधव, संतोष सातपुते, आबासाहेब ढवळे, सतीश काळे, संतोष कवडे,श्रीमंत जगताप,नागनाथ म्हस्के, ज्ञानेश्वर लोभे, सचिन आल्हाट, संदीप निकम, कुणाल कांबळे, सचिन बोऱ्हाडे, संदीप बोराडे, सागर लश्करे, स्वप्निल शिंदे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा. राष्ट्रपती महोदयांसमोर सादर झालेल्या या भव्य महानाट्यप्रयोगात सुमारे 250 हून अधिक कलाकारांनी सहभाग नोंदवत शिवचरित्रातील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक प्रसंग जिवंत केले. घोडे, उंट, भव्य नेपथ्य, पारंपरिक वेशभूषा, अत्याधुनिक प्रकाशयोजना, प्रभावी ध्वनीसंयोजन आणि नेत्रदीपक आतषबाजीच्या सहाय्याने उभारण्यात आलेल्या प्रत्येक दृश्याला उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महानाट्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्माआधीचा सामाजिक व राजकीय कालखंड, बालपण, संत तुकाराम महाराज आणि शिवाजी महाराज यांची ऐतिहासिक भक्ती-शक्ती भेट, तोरणा विजय, स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, शेतकऱ्यांसाठीचे आज्ञापत्र, प्रतापगड मोहीम, पन्हाळगड वेढा व सुटका, स्वराज्याच्या आरमाराची उभारणी, पुरंदरचा तह, आग्रा भेट, नरवीर तानाजी मालुसरे यांचा कोंढाणा विजय आणि भव्य शिवराज्याभिषेक सोहळा यांसारखे प्रसंग प्रभावीपणे सादर करण्यात आले. या सजीव सादरीकरणामुळे उपस्थितांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना जागृत होत अनेकांनी उभे राहून या प्रसंगांना दाद दिली.

कार्यक्रमस्थळी नागरिकांसाठी सुयोग्य बैठक व्यवस्था, वाहतूक नियोजन, सुरक्षा व्यवस्था तसेच आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे तसेच सहाय्यक सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम यांच्या अधिपत्याखाली कायदा सुव्यवस्थेसाठी परिसरात 20 सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली होती.

दरम्यान, 'शिवगर्जना' या महानाट्याचे आणखी दोन प्रयोग 18 व 19 फेब्रुवारी 2026 रोजी याच ठिकाणी सायंकाळी 6.30 वाजता सादर करण्यात येणार असून नागरिकांनी या भव्य महानाट्यप्रयोगाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968